शासकीय अधिकारी/कर्मचारी यांना हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन निर्णय क्रमांक हिंभाप-१०९२/१३०६/(प्र.क्र.१२९/९२)२०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२,

दिनांक:- १६ नोव्हेंबर, १९९२.

वाचा:-१. शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१९७६/२८, दिनांक १०.६.७६
२. शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८०/१३१/वीस, दिनांक २५ मे १९८१
३. शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८३/१४४८/वीस, दिनांक १७.१२.८३
४. शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८३/१४४८/वीस, दिनांक १.१२.८४
५. शासन निर्णय क्रमांक-हिंभाप-१०८५/६८४/वीस, दिनांक १९.११.८५

प्रस्तावना:-

वर नमूद केलेल्या शासन निर्णयान्वये राज्य शासकीय कर्मचाऱ्यासाठी/अधिकाऱ्यासाठी हिंदी भाषा परीक्षा नियमावली विहित करण्यात आली आहे. या नियमावलीनुसार जे अधिकारी/कर्मचारी माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा हिंदी या विषयासह उत्तीर्ण झाले आहेत अशा अधिकारी/कर्मचाऱ्यास उपरोक्त हिंदी भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट देण्यात येते. मात्र कोणत्या दिनांकापासून अशी सूट देण्यात यावी या बद्दल या नियमावलीत काही उल्लेख नसल्यामे त्या बाबत विचारणा करण्यात येत असते. तरी याबाबत आता खालील प्रमाणे खुलासा करण्यात येत आहे :-

शासन निर्णय:-

ज्या अधिकाऱ्यांनी/कर्मचाऱ्यांनी माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाची परीक्षा ५० अथवा १०० गुणांच्या हिंदी विषयासह उत्तीर्ण केली असेल, अशा अधिकारी कर्मचाऱ्यास हिंदी भाषा परीक्षेतून सूट ज्या दिनांकाला संबंधीत परीक्षा संपली असेल, त्या दिनांका पासून किंवा सेवेत भरती झालेल्या दिनांकापासून यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून देण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(अ.व.आम्बेरकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपाल यांचे सचिव,

कृ.मा.प.

मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्य मंत्री यांचे खाजगी सचिव/
स्वीय सहाय्यक,
प्रबंधक, मूळ न्याय शाखा, उच्च न्यायालय, मुंबई (पत्राने),
प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई (पत्राने),
सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई,
महालेखापाल, महाराष्ट्र-२, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
निरनिराळ्या मंत्रालयीन विभागाखालील इतर सर्व विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व मंत्रालयीन विभाग,
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई,
भाषा संचालक (५ प्रती),
~~निवड-फाईल (५ प्रती).~~